(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग - ६ करीता )

**न्यायालयीन प्रकरण**

क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३.
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंह् मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- **२४/०३/२०१७.**

वाचा :-
१) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.१०/१०/२०१३.
२) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.२४/१०/२०१३.
३) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.३०/१०/२०१३.
४) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.०८/११/२०१३.
५) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.११/११/२०१३.
६) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.१२/११/२०१३.
७) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.३०/१२/२०१३.
८) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.२८/०२/२०१४.
९) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.११/०४/२०१४.
१०) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.०३/०५/२०१४.
११) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.२४/०५/२०१४.
१२) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.२५/०६/२०१४.
१३) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.०९/०७/२०१४.
१४) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.३१/१२/२०१४.
१५) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.२०/०२/२०१४.
१६) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.०२/०१/२०१५.
१७) या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/२६४/२०१३, दि.२५/११/२०१६.
१८) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांनी संगणक संकेत स्थळावर दि.२८/१२/२०१६ रोजी निर्गमीत केलेले आदेश.

-------00000-------

शासनाच्या दि.२९ जून, २०१३ मधील तरतुदींनुसार ३० ऑगस्ट, २०१३ ते १ सप्टेंबर, २०१३ या कालावधीत विभागीय अर्हता परीक्षा २०१३ घेण्यात येवून ७ ऑक्टोबर, २०१३ रोजी त्याचा निर्णय जाहीर झाला. सदर परिक्षेकरिता एकूण २८,११४ कर्मचाऱ्यांनी त्यांची पात्रता आजमावली व त्यातून १९,३८४ कर्मचारी अर्हता परिक्षेत उत्तीर्ण झाले. त्या कर्मचाऱ्यांमधून त्यांच्या पोलीस शिपाई पदावरील भरती दिनांकाच्या सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीच्या रिक्त पदात माहे ऑक्टोबर, २०१३ ते जुलै, २०१४ या कालावधीत एकूण १,९०७ कर्मचाऱ्यांना उपरोक्त आदेशांन्वये पोलीस उप निरीक्षक पदावर ११ महिन्यांच्या कालावधीकरीता तात्पुरत्या / अभावित स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली आहे.

२. उपरोक्त पदोन्नतीच्या अनुषंगाने पोलीस शिपाई व पोलीस नाईक यांना अर्हता परिक्षेस बसु देण्याच्या तरतुदीला मुंबईतील लेखनिक पोलीस हवालदारांनी आक्षेप घेवून मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपिठापुढे अर्ज क्र.७६७/२०१३ व २८४/२०१४ दाखल केले होते. सदर अर्जांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि.०९/०७/२०१४ रोजी निर्णय देवून पोलीस उप निरीक्षकांच्या सेवाप्रवेश नियमांत सुधारणा करणारा दि.२९ जून, २०१३ चा शासन निर्णय रद्द ठरविला होता.

३. याबाबत मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपिठापुढे दाखल केलेले मूळ अर्ज क्र.७६७/२०१३ व २८४/२०१४ मधील उमदेवार प्रदीप मुरलीधर सोनवणे यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.८९११/२०१४ दाखल केली होती. तसेच शसनाने देखील मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये मूळ अर्ज क्र.७६७/१३ व २८४/१४ च्या आदेशाविरुध्द याचिका क्रमांक ४०७८/२०१५ मा. उच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यास अनुसरुन मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठात दि.१२/०१/२०१५ च्या अंतरिम आदेशांनुसार या कार्यालयाने

निर्गमित केलेले दि.३१/१२/२०१४ चे १,९०७ पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस उप निरीक्षक पदाची नियमीत पदोन्नती देण्यात येणार होती, त्या उक्त अंतरिम आदेशांद्वारे दि.१२/०१/२०१५ रोजी Status-quo (जैसे थे) चे आदेश दिले होते.

४. त्यानंतर दि.०५/०२/२०१५ च्या मा. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशांनुसार या कार्यालयाने निर्गमित केलेल्या दि.३१/१२/२०१४ च्या उपरोक्त आदेशास स्थगिती दिली असल्यामुळे या प्रकरणातील १,९०७ कर्मचाऱ्यांना तात्पुरती, अभावित स्वरुपात ११ महिन्यांसाठी पोलीस उप निरीक्षक पदाची पदोन्नती या कार्यालयाच्या समक्रमांकित आदेश, दि.२०/०२/२०१५, ०२/०१/२०१६ व २५/११/२०१६ अन्वये देण्यात आलेली आहे.

५. मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठासमक्ष दि.०८/१२/२०१६ ते दि.२१/१२/२०१६ दरम्यान् उक्त परिच्छेद क्रमांक ०३ मधील सर्व याचिकेमध्ये एकत्रित व अंतिमरित्या सुनावणी झाली आहे. याचिका क्र.८९१९/२०१४, १०८७७/२०१४ व ८८४३/२०१४ मधील पोलीस कर्मचाऱ्यांनी अशी याचिका केली होती की, शासनाने पोलीस उप निरीक्षक (सेवाप्रवेश) नियम, १९९५ मधील नियम ३ (अ) मध्ये शासन आदेश दि.२९/०६/२०१३ रोजी केलेली सुधारणा ही चुकीची आहे. त्यामध्ये पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नतीसाठी खात्यातील नेमणुकीचा दिनांक हा जो निकष लावलेला आहे, त्या निकषाऐवजी ज्यावेळेस ही परीक्षा घेण्यात आली त्या परीक्षेच्यावेळी जे कर्मचारी ज्या पदावर कार्यरत आहेत, उदा. पोलीस नाईक, पोलीस हवालदार, किंवा सहायक पोलीस उप निरीक्षक, त्या पदातील सेवाज्येष्ठतेनुसार नेमणूक देण्यात यावी. तथापि सदरील याचिका मा. उच्च न्यायालयाने खारीज केलेली आहे व शासनाच्या वतीने दाखल केलेली याचिका क्रमांक ४०७८/२०१५ मान्य केली, म्हणजेच पोलीस उप निरीक्षक (भरती) नियम १९९५ मधील नियम ३ (अ) मधील २०१३ मध्ये शासनाने केलेली सुधारणा वैध ठरविली आहे.

६. त्यामुळे आता सदर १,९०७ अभावित पोलीस उप निरीक्षकांना पोलीस उप निरीक्षक पदाची नियमीत पदोन्नती देणे आवश्यक आहे. तथापि वर नमूद संदर्भामध्ये १३ कर्मचाऱ्यांची नावे अभावित पोलीस उप निरीक्षक पदावर दोनदा दर्शविण्यात आली आहेत. ०४ कर्मचाऱ्यांनी अभावित पोलीस उप निरीक्षक पदाची पदोन्नती स्विकारलेली नाही. ०३ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल असल्याने त्यांना अभावित पोलीस उप निरीक्षक पदाची पदोन्नती देण्यात आलेली नाही. ०१ कर्मचाऱ्याची शिक्षा सुरु असल्यामुळे त्यांना अभावित पोलीस उप निरीक्षक पदाची पदोन्नती देण्यात आलेली नाही. तसेच ०२ कर्मचारी अनुत्तीर्ण असतांना त्यांना अभावित पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली होती. त्यामुळे १,९०७ अभावित पोलीस उप निरीक्षक यांच्यापैकी एकूण १,८८४ अभावित पोलीस उप निरीक्षकांना पोलीस उप निरीक्षक पदावर नियमीत पदोन्नती देणे आवश्यक असल्यामुळे आता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

## -: आदेश :-

(१)

उपरोक्त नमूद या कार्यालयाचा समक्रमांकित आदेश दि.३१/१२/२०१४ अन्वये पोलीस उप निरीक्षक पदावर नियमित पदोन्नती दिलेल्या आदेशांतील ( अ.क्र. १ ते १,९०७ ) आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

(२)

सन २०१३ मध्ये झालेल्या विभागीय अर्हता परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी खालील नमूद ९७० उमेदवारांना त्यांचे सेवाजेष्ठतेनुसार व प्रवर्गातील रिक्त पदांनुसार स्थानापन्न पोलीस उप निरीक्षक प्रवर्गात उपलब्ध असलेल्या ९७० रिक्त पदात दि.०१/१०/२०१३ पासून नियमित पदोन्नती देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अर्हताप्राप्त अमलदाराचे नांव | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | झुरुंगे ज्ञानोबा मारुती | पुणे शहर |
| २. | शेख नियाजोद्दीन फजलोद्दीन | पुणे शहर |
| ३. | पवार शरद बाबुराव | पुणे शहर |
| ४. | कुंभार चंद्रकांत मुरलीधर | कोल्हापूर परिक्षेत्र |
| ५. | बाकडे शालीग्राम नारायण | नांदेड परिक्षेत्र |
| ६. | बनसोडे तंगाजी मनोहर | मुंबई शहर |
| ७. | कदम अरुण शामराव | मुंबई शहर |
| ८. | चुंबळकर सुभाष भिकू | पुणे शहर |
| ९. | परब रामचंद्र गोपाळ | मुंबई शहर |
| १०. | जाधव अशोक बळीराम | मुंबई शहर |